**कृपया प्रसिद्धीसाठी** **25 फेब्रुवारी 2011**

## 'ममता' मुंबईची सावत्र आई : राम नाईक

**मुंबई,शुक्रवार:** "रेल्वे मंत्री कु. ममता बॅनर्जी मुंबईशी सावत्र आई प्रमाणेच या अर्थसंकल्पात वागल्या आहेत. मुंबईच्या सत्तर लाख उपनगरवासीयांच्या जिव्हाळ्याची एमयुटीपी - एक योजना केव्हा पूर्ण होणार तसेच एमयुटीपी - दोनचे वेळापत्रक केव्हा ठरणार याबद्दल त्या अर्थसंकल्पाच्या भाषणात काहीच बोलल्या नाहीत." अशी प्रतिक्रिया माजी रेल्वे राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) यांनी रेल्वे बजेट नंतर व्यक्त केली.

"पश्चिम रेल्वेच्या विरार - डहाणू मार्गावरती उपनगरी गाड्या सुरु करण्याची तारीख त्या जाहीर करतील अशी प्रवाशांची अपेक्षा होती ती फोल ठरली आहे. एमयुटीपी - एकप्रमाणे 12 डब्यांच्या सर्व गाड्या डिसेंबर 2009 मध्ये होणार होत्या त्याचे सुधारीत वेळापत्रकही त्यांनी सांगितले नाही", असेही श्री. नाईक म्हणाले.

"रेल्वेची बिघडलेली आर्थिक स्थिती रुळावर कशी आणणार यासंबंधीही स्पष्ट दिशादर्शन अर्थसंकल्पात नाही. त्यामुळे अनेक प्रकल्पांची घोषणा झाली तरी ते कसे पूर्ण होणार हा यक्ष प्रश्न आहे." असेही श्री. राम नाईक म्हणाले.

**(कार्यालय सचिव)**